# आकाशवाणी नागपूर,

# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

# सोमवार, दिनांक १० जून २०२४

## ठळक बातम्या

1. **नरेंद्र मोदी यांनी स्वीकारला पंतप्रधान पदाचा कार्यभार - किसान सन्मान निधीचा सतरावा हप्ता जारी.**
2. **राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २५व्या वर्धापनदिना निमित्त शरदचंद्र पवार ग□ाचा सोहळा अहमदनगर इथं तर अजित पवार ग□ाचा सोहळा मुंबईत साजरा.**
3. **राज्यातील पाऊस, शेती, बी-बियाणे आणि पूरस्थिती नियंत्रणाचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून आढावा.**

**आणि**

4. **राज्यात मान्सून दाखल- संपूर्ण विदर्भात उद्या वादळी पर्जन्यमानाची शक्यता.**

*****

### पीएम किसान निधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज कार्यभार स्वीकारला. हा पदभार तिसऱ्यांदा स्वीकारल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम पंतप्रधान किसान सन्मान योजनेचा, १७वा हप्ता जारी केला. या वीस हजार कोटी रुपयांच्या निधीचा फायदा, नऊ कोटी तीस लाख शेतकऱ्यांना होणार आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी हे सरकार वचनबद्ध असल्याचं अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिली.

### मंत्रिमंडळ शपथविधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह रालोआ मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा काल राष्ट्रपती भवनात झाला. यावेळी ३० कॅबिनेट, पाच राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार आणि ३७ राज्यमंत्र्यांना राष्ट्रपतींनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. भाजपचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, एस.जयशंकर, पीयूष गोयल या मंत्र्यांनी नव्या रालोआ मंत्रिमंडळात पुन्हा एकदा शपथ घेतली आहे.

तर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, राजीव रंजन सिंह, चिराग पासवान, अन्नपूर्णा देवी या नेत्यांचा नव्या मंत्रिमंडळात समावेश झाला आहे. चार माजी मुख्यमंत्र्यांनी देखील काल शपथ घेतली. यात मध्यप्रदेशचे शिवराजसिंह चौहान, हरियाणाचे मनोहरलाल खट्टर, बिहारचे जितनराम मांझी आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एच.डी.कुमारस्वामी यांचा समावेश आहे. शिवसेनेचे प्रतापराव जाधव आणि रालोदचे जयंत चौधरी या दोन मंत्र्यांनी पहिल्यांदाच राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार म्हणून शपथ घेतली. श्रीपाद नाईक, कृष्ण पाल, रामदास आठवले, नित्यानंद राय, बी.एल राय या राज्यमंत्र्यांचं मंत्रिमंडळातलं स्थान कायम राहिलं आहे. तर जितिन प्रसाद, पेम्मासानी चंद्रशेखर, रवनित सिंह, सुरेश गोपी, रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ या खासदारांना पहिल्यांदाच राज्यमंत्री म्हणून जबाबदारी मिळाली आहे. रालोआ सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातल्या अनेक मंत्र्यांना तिसऱ्या कार्यकाळात संधी मिळाली नाही. यात मंत्री अर्जुन मुंडा, नारायण राणे, महेंद्रनाथ सिंह, पुरुषोत्तम रुपाला, अनुराग ठाकुर या मंत्र्यांचा समावेश आहे. तसंच, राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल, अश्विनी कुमार चौबे, व्ही.के.सिंह, स्वाध्वी निरंजन ज्योती यांनाही नव्या मंत्रिमंडळात स्थान मिळालं नाही.

**सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा**

सिक्कीम क्रांतिकारी मोर्चाचे अध्यक्ष, प्रेमसिंग तमांग यांनी त्यांच्या मंत्रिमंडळासह सिक्कीमचे मुख्यमंत्री म्हणून राज्याची राजधानी, गंगटोक इथल्या पालजोर स्टेडियमवर आज चार वाजता शपथ घेतली. राज्यपाल लक्ष्मणप्रसाद आचार्य यांनी तमांग आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. तमांग यांच्या नेतृत्वाखालील सिक्कीम क्रांतिकारी मोर्चानं २०२४च्या सिक्कीम विधानसभा निवडणुकीत ३२ पैकी ३१ जागा जिंकून प्रचंड बहुमतानं दुसऱ्यांदा सत्ता राखली आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रेमसिंग तमांग यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**विधानसभा पो□निवडणूक**

देशातल्या तेरा विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगानं जाहीर केला आहे. त्यात पश्चिम बंगालमधले चार

मतदारसंघ, हिमाचल प्रदेशातले तीन, उत्तराखंडातले दोन तसंच बिहार, तमिळनाडू, मध्य प्रदेश आणि पंजाबमधल्या प्रत्येकी एका मतदारसंघाचा समावेश आहे. या पोटनिवडणुकांसाठी येत्या दहा जुलैला मतदान होईल, तर तेरा जुलैला मतमोजणी होईल.

**राष्ट्रवादीचा २५ वा वर्धापन दिन**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २५व्या वर्धापनदिना निमित्त पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मुंबईतील पक्ष कार्यालयात आज झेंडावंदन पार पडले. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री अनिल पाटील, रुपाली चाकणकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. तर शरद पवार गटाने आज सकाळी पुण्यात ध्वजारोहण करून हा दिवस साजरा केला. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर हा पहिलाच वर्धापन दिन आहे. २५व्या वर्धापनदिना निमित्त अजित पवार गटाचा मेळावा मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात आयोजित करण्यात आला होता. लोकसभेत आपल्याला अपेक्षित यश मिळालं नाही पण विधानसभेत आपल्याला सर्व जाती धर्मांची मन जिंकून घ्यावी लागतील असं प्रतिपादन, यावेळी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केलं. मराठ्यांना दहा टक्के आरक्षण दिल आणि ते टिकणारं आहे असंही ते म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपस्थितांना संबोधित करतांना राष्ट्रवादीच्या कामाचा आढावा घेतला आणि दिवंगत नेत्यांना आदरांजली वाहिली. पक्षवाढीसाठी शरद पवारांसह अनेक नेत्यांनी महत्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. राष्ट्रवादी नेते प्रफुल पटेल यांच्या गृह जिल्यातही अजित पवार राष्ट्रवादी गटाचा २५सावा वर्धापन दिवस आज साजरा करण्यात आला. यावेळी गोंदिया जिल्यातील अजित पवार राष्ट्रवादी गटाचे नेते कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा वर्धापन सोहळा अहमदनगर इथल्या न्यू आर्टस् महाविद्यालयात सुरु आहे. या कार्यक्रमाला शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील आणि नवनिर्वाचित खासदार उपस्थित राहणार आहेत.

**नी**

वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीटचा निकाल रद्द करून पुन्हा चाचणी घेण्याची मागणी करणारी याचिका आज विद्यार्थ्यांकडून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. दरम्यान केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा नीट मध्ये दीड हजारांहून अधिक उमेदवारांना देण्यात आलेल्या अतिरिक्त गुणांचं पुनरावलोकन करण्यासाठी चार सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. संघ लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष या समितीचे प्रमुख असतील अशी माहिती काल नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात NTAचे महासंचालक सुबोधकुमार सिंग यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**जम्मू-काश्मीर दहशतवादी हल्ला**

काश्मीरच्या रियासी जिल्हयात जिहादी दहशतवाद्यांनी, रविवारी भाविकांच्या बसवर हल्ला केला होता. यात एका बालकासह नऊ जणांचा मृत्यू झाला होता. हल्ल्या दरम्यान बस खोल दरीत कोसळली. या घटनेच्या तपासासाठी, राष्ट्रीय तपास यंत्रणेचे पथक आज, घटनास्थळी दाखल झालं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परिस्थितीचा आढावा घेतला असून, जखमींना मदत करण्याची सूचना नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांना दिली आहे.

**कृषी तक्रार हेल्पलाईन**

कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्याच्या खरीप हंगामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी बी-बियाण्यांची चढ्या भावानं विक्री, बोगस वाण विक्री, अनावश्यक खरेदी सक्ती करणाऱ्या विरूद्ध शेतकऱ्यांसाठी 'कृषी तक्रार व्हाट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक' जारी करण्याचे निर्देश दिले. यासाठी कृषी विभागाकडून 9822446655 हा व्हाट्सअॅप क्रमांक जारी करण्यात आला आहे. त्याचबरोबर तक्रारकर्त्यांचं नाव पूर्णपणे गोपनिय ठेवलं जाणार आहे.

अजित पवार मंत्रालय बैठक

हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात समाधानकारक पाऊस अपेक्षित असून, पावसाच्या आगमनानंतर शेतकरी खरीप पिकांच्या पेरणीच्या तयारीला लागला आहे. त्यामुळे खते-बियाण्यांच्या अभावी कुठेही, पेरण्यांना विलंब होता

कामा नये. त्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक प्रमाणात बियाणे, खतांचा पुरवठा करावा. प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळण्याची दक्षता घ्यावी असे निर्देश, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांना दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या मंत्रालयीन दालनात आज राज्यातील पाऊसमान, खते, बी-बियाणे पुरवठा, पीक कर्ज वितरण, टँकरची स्थिती, धरणांतील पाणीसाठा आणि विसर्गाचे नियोजन, पूर नियंत्रण, चारा उपलब्धता याबाबत दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून आढावा घेतला. पाऊसमान चांगलं असल्यामुळ पाणी तुंबणे, अनियंत्रित विसर्गामुळे पूर येणे आदींबाबत यंत्रणांनी काळजी घ्यावी. पूरस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत, पूर्वसूचना देऊन सतर्क करावं. वेळेवर मदत आणि पुनर्वसनाचे सर्व उपाय योजण्याचा प्रयत्न करावा. जलसंपदा विभागानं धरणांमधील पाणी सोडण्याबाबत योग्य ते नियोजन करावं आणि अन्य यंत्रणांशी समन्वय ठेवावा तसंच शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेवर उपलब्ध होईल याबाबत बँकांना सूचना द्याव्यात असे निर्देशही, उपमुख्यमंत्री पवार यांनी दिलेत.

**हुमणी अळी**

खरीप हंगाम पेरणीपूर्वी, बियाण्याची प्रतवारी बीजप्रक्रिया आणि उगम शक्ती मोहिमेनंतर, बुलढाणा जिल्ह्यच्या सर्व गावामध्ये हुमणी अळी नियंत्रण करण्यात येत आहे. यात कृषी विभागाकडून सामूहिक पद्धतीनं हुमणी अळी नियंत्रणाबाबत मोहीम राबविण्यात येत आहे. वळवाचा पाऊस पडल्यानंतर हुमणी अळीचे भुंगेरे, कोशातून बाहेर पडून बाभूळ, कडूनिंब किंवा बोर झाडावर अंडे द्यायला सुरुवात करतात. त्यामुळे सदरील झाडाखाली, लाईट ट्रॅपचा वापर केल्यास प्रभावी नियंत्रण शक्य आहे.

**मुख्यमंत्री वयोश्री योजना**

राज्यातील ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधनं आणि उपकरण खरेदीसाठी तसंच मनःस्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्रा द्वारे त्यांचं मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री वयोश्री योजना

राबविण्यात येते. इच्छुक ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांकडून २५ जूनपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अनुसूचित जाती,कायदा**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अंतर्गत सर्व प्रकरणे तातडीनं निकाली काढण्याच्या सूचना, वर्ध्याचे अपर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले यांनी आज दिल्या. जिल्हा दक्षता आणि नियंत्रण समितीची बैठक आज अपर जिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती, यावेळी ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी यांनी मागील प्रलंबित असलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेतला, यामध्ये बलात्कार, विनयभंग, मारहाण तसंच गंभीर दुखापत यासारख्या प्रकरणांचा तपास तात्काळ पूर्ण करून चार्टशिट सादर करावी.

**हवामान**

राज्यात मान्सून दाखल झाला असून, हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात समाधानकारक पाऊस अपेक्षित आहे. विदर्भातील सर्व जिल्ह्यांत तापमानात एक ते दोन अंश सेल्सिअसची घट पहायला मिळत आहे. मागील चोवीस तासांत अमरावती इथं कमाल तापमान ४१.२ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं तर नागपूरमध्ये कमाल ३९.६ इतकं नोंदविल गेलं. काल यवतमाळ वगळता पश्चिम विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांत पावसानं हजेरी लावली. बुलढाणा इथं ४९.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. आज आणि उद्या संपूर्ण विदर्भात विजांच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा आणि पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे 'कार्यकर्ता विकास वर्ग-द्वितिय समापन' समारोहाचं आयोजन आज सायंकाळी साडेसहा वाजता, रेशीमबाग नागपूर इथ करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत तसंच महंत श्रीरामगिरी महाराज हे उपस्थितांना संबोधित करतील.

******